# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ७/१/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१९) इतिवृत्त

**बुधवार,** दिनांक **०७ जानेवारी २००९ रोजी** स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी १२-२० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(म.) श्री.एम.उध्दव घुगे, उप आयुक्त(प्र.) श्री.एम.वाय.कांबळे, नगर सचिव श्री. एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान मामु
२. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
३. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
४. श्री.वसंत नरवडे पाटील
५. सौ. अल्पा विकास जैन
६. श्री. संजय रामदास जोशी
७. श्रीमती जयश्री किवळेकर
८. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
९. श्री. रविकांत गवळी
१०. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
११. श्री. कचरू सोनवणे
१२. श्री. कचरू मोरे
१३. श्री. सिताराम सुरे
१४. श्री. नारायण कुचे

**संवाद :**

श्री.नारायण कुचे : महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला बुढ्ढीलेन नगर भुमापन क्रमांक २३५० हि जागा स्वता:च्या मालकीची असतांना खाजगी मालकांला बांधकाम परवानगी दिली होती का? ती रद्द का करण्यात आली खुलासा करण्यात यावा. माझ्या माहिती नुसार खाजगी मालक श्रीमती पाशा बेगम रिझवान शहा यांना परवानगी दिली होती व नंतर रद्द करण्यात आली तर कोणत्या आधारे परवानगी दिली व कोणत्या आधारे रद्द करण्यात आली.

शहर अभियंता : याबाबत सध्या मला माहिती नाही. पुढील सभेत देण्यात येईल.

मालमत्ता अधिकारी : सिटीएस नं.२३५० हया महानगरपालिकेच्या जागेवर परवानगी देण्यात आली. नंतर ती रद्द करण्यात आली होती. इथपर्यंत मला माहित आहे. नगर रचना विभाग बांधकाम परवानगीच्या संबंधीत विभाग आहे.

मा.सभापती : फाईल मागविण्यात आली आहे एक तासात खुलासा सादर करतील.

श्रीमती सफिया मोमीन : हॉटेल परिवार चे मालक स्वत:हुन हॉटेल तोडण्यात येत होते मग ४० ते ४५ हजार रूपये तोडण्यासाठी खर्च करण्याची काय गरज होती.

मा.सभापती : मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे मा.आयुक्तांनी केलेली कारवाई उचित व बरोबर आहे. तसेच धनादेश माझ्या माहितीप्रमाणे देण्यात आलेला आहे.

श्री.संजय जोशी : महानगरपालिका ड वर्गात मोडते का? आस्थापना विभागाने खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : औरंगाबाद महानगरपालिका ड वर्गात मोडते.

श्री.संजय जोशी : ड वर्ग महानगरपालिकेत शहर अभियंता हे पद कुठल्या संवर्गातुन भरावे किंवा शासनाकडुन कुठल्या संवर्गातुन भरणे अपेक्षीत आहे.

उपआयुक्त (म) : औरंगाबाद महानगरपालिका ड वर्गात सध्यास्थितीत आहे. शहर अभियंता हे पद ड वर्गातील महापालिकांना कार्यकारी अभियंता संवर्गातील आहे.

श्री.संजय जोशी : सध्या शहर अभियंता आलेले आहे ते कुठल्या संवर्गातुन आहे.

उपआयुक्त (म) : औरंगाबाद महापालिकेमध्ये सध्या स्थितीत कार्यरत असलेले शहर अभियंता हे एस.ई. (S. E.)कॅडरमधले आहेत.

श्री.संजय जोशी : शहर अभियंता यांच्या येणेबाबत मला कुठलाही आक्षेप नाही, आमच्याकडे ड वर्ग महापालिकेत असतांना कार्यकारी अभियंताच्या संवर्गातील पद भरायचे असतांना कशामुळे त्यांना रूजु करून घेतले, बदलेल्या संवर्गाचा पगाराचा खर्च कोण करणार.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : श्री.सी.एस.सोनी हे कुठल्या संवर्गातील होते आणि सरकारने श्री.सोनी यांना कुठला संवर्ग दिला होता.

उपआयुक्त (म) : यापुर्वी औरंगाबाद महानगरपालिकेत कार्यरत असलेले शहर अभियंता श्री.सी.एस.सोनी हे अधिक्षक अभियंता संवर्गात होते.

श्री.वसंत नरवडे : महापालिका ड वर्गात केव्हा आली, ड वर्गात येण्याआधी प्रशासनाने शासनास प्रस्ताव पाठविला होता का? त्यानंतर यांची नियुक्ती आली काय? ड वर्गात आल्यास सर्वच पदांना खाली आणावी लागेल. सर्व गोष्टी शासनास निर्देशनास आणून दयायला पाहिजे.

श्री.संजय जोशी : ड वर्गात महापालिका गेल्यानंतर जो जी.आर आला त्या जी.आर.प्रमाणे जे सगळे पद आहे श्री.खैरनार ते श्री.सोनी यांच्यापर्यंतचे सर्वपदे लॅप्स झालेले आहे. सदरचे पदे लॅप्स झालेले असतांना जी.आर.मध्ये नमुद केल्याप्रमाणे जो पर्यंत सदर पदावरील व्यक्ती कार्यन्वित आहे तो पर्यंत त्यांना हे सर्व फायदे दयावेत. ती व्यक्ती त्या पदावरून गेल्यावर ते पद त्या संवर्गातून भरण्यात येवू नये. जी.आर.मध्ये असे असतांना हे पद का भरले याचा खुलासा पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ड वर्ग महापालिके प्रमाणे आपल्याकडे सर्व पदे, पदोन्नती झालेली आहे काय? ड वर्गाप्रमाणे आपल्या महापालिकेचा सेटअप आहे काय? ड वर्गाप्रमाणे कायदयाने जे पदे दिलेले आहे त्या त्या पदावर क्वालिफाईड काम करणारे आहेत काय याचा खुलासा व्हावा.

उपआयुक्त (म) : महापालिका ड वर्ग संवर्गात गेल्यावर काही संवर्गाबाबत श्रेणी कमी जास्त झ ाालेली आहे. वॉर्ड ऑफिसर पुर्वी ७४५० हया ग्रेडमध्ये होते परंतु नविण ड वर्गाच्या जी.आर. नुसार वॉर्ड ऑफिसरचा ग्रेड ६५०० झालेला आहे, ज्या दोन पदोन्नती देण्यात आल्या आहेत त्या ६५००च्या ग्रेड मध्ये देण्यात आलेल्या आहेत आणि शहर अभियंताच्या बाबतीत आपल्याकडे एक पद रिक्त होते त्यावर शासनाने अधिकारी पाठविला आहे तो आपण रूजु करून घेतला आहे.

श्री.संजय जोशी : शहर अभियंता पदी शासनाने शहर अभियंताना पाठविले त्यांना रूजू करून घेतले मुख्यलेखाधिकारी यांना विचारण्यात यावे की, शहर अभियंताचा पगार कुठल्या नियमान्वये देण्यात येणार आहे. शासन पगार देत नाही तर महापालिका पगार देते. महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना/ऑफिसरचा ग्रेड ७४५० वरून ६५०० केलेला आहे मग एकच पद शासनाकडच हया पदावर का भरण्यात आल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : क वर्ग महापालिकेत नेण्याचा शासनाच्या विचाराधीन असल्याने पद भरण्यात आले असेल. शहर अभियंता रूजु होउन चार महिणे झाल्यानंतर सदरचा विषय काढण्यात आला.

मा.सभापती : पगाराबाबत मुख्य लेखापरिक्षक आणि मुख्य लेखाधिकारी खुलासा करीत आहे.

| | |
|---|---|
| प्र.मुख्य लेखाधिकारी | : जो पर्यंत एखादा अधिकारी महानगरपालिकेत कार्यरत राहतो, प्रशासनाने त्यांना रूजु करून घेतले आहे त्यांच्या वेतनाच्या बेसिकनुसार वेतन दयावे लागते. |
| श्री.संजय जोशी | : आपल्या महापालिकेत हे पद कार्यकारी अभियंता संवर्गातील आहे मग हया पदावरचा (शहर अभियंता) पगार देण्याचा अधिकारी आहे काय? रूजु करून घेण्याचा अधिकार काय? |
| प्र.मुख्य लेखाधिकारी | : रूजु करून घेण्याचा अधिकार प्रशासनाला आहे. |
| श्री.संजय जोशी | : पगार देण्याचा अधिकार प्रशासनाचा आहे तर मग बाकीच्या पोस्ट ड वर्गाच्या का केल्या गेल्या व फक्त शासनाने पाठविलेली हि पोस्ट अपग्रेड केली. यास कारण काय? |
| मा. सभापती | : शहर अभियंतांना सुट्टीवर पाठवु. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : शासनास सांगण्यात यावे की, महापालिकेचा दर्जा वाढविण्यात यावा नसेल तर यांच्या ऐवजी दुसरा माणुस देण्यात यावा. चार महिणे झाल्यानंतर सदरचा विषय काढण्यात आला. |
| श्री.अ.रशीदखान मामू | : शासनाकडून माहिती मागवावी. |
| श्री.संजय जोशी | : मला जेव्हा कळाले की, सदरील पद हे कार्यकारी अभियंता संवर्गातील आहे. मग क वर्गातील अधिकारी रूजु करून कसे घेतले. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : अपग्रेड होण्याबाबत सरकारला वाटत असेल तर चांगली बाब आहे, महापालिकेस चांगला माणुस मिळत असेल तर काय हरकत आहे. |
| मा.सभापती | : सरकारचे मार्गदर्शन येईपर्यंत शहर अभियंता यांना सुट्टीवर पाठविता येईल. स.स.श्री.जोशी यांचे म्हणणे बरोबर आहे ड वर्ग महापालिकेस सी वर्ग महापालिकेचा माणुस कसा. |
| श्री.संजय जोशी | : शासनाच्या जी.आर.प्रमाणे मला खुलासा पाहिजे. |
| मा.सभापती | : मा.उपआयुक्त यांनी खुलासा केला आहे की, नविण दोन वॉर्ड अधिकारी दिलेले आहे त्यांना ड वर्ग प्रमाणे ६५०० चा स्केल देण्यात आलेला आहे. त्यामुळे आपल्या कर्मचाऱ्यांवर अन्याय करत आहे व बाहेरच्या लोकांचा विचार होतो, हे बरोबर नाही. |
| श्री.सतिष कटकटे | : रूजु करून घेतले कसे, रूजु करून घेतांना विचार करावयास पाहिजे होते. |
| मा.सभापती | : ड वर्ग महापालिकेत शहर अभियंता यांना वाढीव पगार देण्याची गरज नाही आणि त्यांना ठेवण्याचीही गरज नाही असे मत आहे. आपल्या अधिकाऱ्यांना ६५०० चा स्केल देण्यात आलेला आहे. त्यामुळे आपल्या कर्मचाऱ्यांवर/अधिकाऱ्यांवर अन्याय करत आहे. शासनाचा निर्णय येईपर्यंत त्यांना सुट्टीवर पाठविण्यात यावे. आपले अधिकारी काम करण्यास सक्षम आहे. |
| श्री.वसंत नरवडे | : असे किती अधिकारी आहेत त्यांची यादी देण्यात यावी. |
| श्री.सतिष कटकटे | : शासनाच्या आदेशाप्रमाणे साफसफाईचे कंत्राट देण्यात आले त्याचे पेमेंट कोण देणार आहे. |
| मा.सभापती | : तो विषय वेगळा आहे महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना पदोन्नती देतांना ड वर्ग महापालिकेचा फार्म्युला अंमलात आणतो व आपल्या अधिकाऱ्यांवर अन्याय करतो, |
| श्री.अब्दुल रशिद मामु | : सदरचा विषय हा सर्वसाधारण सभेचा आहे. |
| मा.सभापती | : जी.बी.चा इश्यु येईपर्यंत शहर अभियंताना सुट्टीवर पाठवून देवू. शासनाचे निर्देश येईल जे.बी.चा निर्णय येईल तेव्हा त्यांना कामावर घेण्यात येईल. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : चार महिणे झाले चार महिण्यांनंतर विषय का काढण्यात आला. |
| मा.सभापती | : मा.आयुक्तांचे निर्देश आहे की, कुठल्या पदाधिकाऱ्यांनी नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना पत्र दिल्यास तिन दिवसांत त्या पत्राचे उत्तर देण्यात यावे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :ती वेगळी बाब आहे. |
| श्री.संजय जोशी | : सदर विषयास वेगळे वळण देवू नका, आपली महानगरपालिका हि ड वर्ग प्रमाणे कारभार चालावा असे आमचे म्हणणे आहे. |

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जे जे अधिकारी क्वालिफाईड नाही अशा सर्वांची यादी काढण्यात यावी.

मा.सभापती : कायदयात न बसणारे अधिकारी कोण कोण आहे.

श्री.वसंत नरवडे : आपल्या अधिकाऱ्यांवर अन्याय होतो हे आम्हाला मान्य आहे.

मा.सभापती : आपल्या अधिकाऱ्यांना पे स्केल कमी करून आपण आपल्या अधिकाऱ्यांवर अन्याय करत आहे.

श्री.वसंत नरवडे : दोन कार्यकारी अभियंताना शहर अभियंतापदी पदोन्नती देतांना कुठली भुमिका मांडली.

मा.सभापती : सदरचा विषय वेगळा आहे, स्थायी समितीने निर्णय दिल्यानंतर तो शासन स्तरावर आहे,

श्री.वसंत नरवडे : श्री.विलास जाधव, मुख्य लेखापरिक्षक यांना शासनाने पाठविले आहे.

मा.सभापती : ड वर्ग महापालिके प्रमाणे त्यांची नियुक्ती बरोबर आहे. श्री.संजय पवार यांच्या बाबतीत मा.आयुक्तांनी घेतलेला निर्णय योग्य आहे.

श्री.अब्दुल रशिद मामु : मा.सभापती सदरचा विषय सर्वसाधारण सभेचा आहे आपण इथे का चर्चा करत आहे.

श्री.सतिष कटकटे : श्री.पानझडे व श्री.सोववणे यांच्या प्रकरणाबाबत दोन ठराव घेण्यात आले होते ते ठराव शासनाकडे पाठविण्यात आले होते का तो मंजूर झाला आहे काय?

मा.सभापती : ठराव मंजूर झाला असता तर शासन शहर अभियंताना पाठविले नसते.

श्री.अब्दुल रशिद मामु : स्थायी समितीला चर्चा करण्याचा अधिकार नाही हा विषय सर्वसाधारण सभेचा आहे, कायदयात न बसणारे कामे करू नका.

मा.सभापती : स.स.श्री.संजय जोशी यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे कुणीही राजकारण करू नये.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता की महापालिका ड वर्गात आहे का, प्रशसनातर्फे एक पत्र आले होते की, ड वर्गात शहर अभियंता हे पद येत नाही, त्यानंतर शासनाने नियुक्ती केली ती कशी. महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेले अधिकारी यांनी प्रतिनियुक्ती हि बरोबर आहे का, अजून काही पदे आहे मग त्या पदावर अधिकारी शासन नियुक्ती का करत नाही.

मा.सभापती : प्रश्न एवढा आहे की ड वर्ग महापालिकेत शहर अभियंता यांना रूजु कसे करण्यात आले.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाकडुन खुलासा पाहिजे होता.

श्री.नारायण कुचे : शहर अभियंता यांना रूजु करून घेणे बंधनकारक होते काय?

मा.सभापती : सर्वसाधारण सभेला पॉलिसी डिसीजन घेण्याचा अधिकार आहे, सर्वसाधारण सभेने मान्य केले तर त्यांना आम्ही घेवू. शहर अभियंतावर अनाधिकृतपणे खर्च होत आहे, महानगरपालिका खर्चात काटकसर करीत आहे आणि शहर अभियंताच्या पगारावर खर्च करीत आहे. स.स.श्री.जोशी यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याची दखल घेतली पाहिजे.

श्री.अब्दुल रशिद मामु : स.स.श्री.जोशी हे शहर अभियंता यांना सुट्टीवर पाठवा असे त्यांचे म्हणणे नाही.

श्री.सतिष कटकटे : महापालिकेची आर्थीक स्थिती खराब आहे हयावर प्रशासनाने खुलासा दयावा.

श्री.अब्दुल रशिद मामु : श्री.सी.एस.सोनी यांना एक वर्ष वाढवुन देण्यात आले, एक वर्ष का वाढविण्यात आले.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली नाही. श्री.सोनी यांच्याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.वसंत नरवडे : सदरचा विषय विषयपत्रीकेवर नसल्याने गांर्भियाने चर्चा करू नये शासनाकडुन या संदर्भात खुलासा मागविण्यात यावा की या पोस्टची गरज आहे किंवा नाही.

मा.सभापती : महानगरपालिकेची आर्थीक स्थिती खराब आहे लेबरचे सुट्टीचे दिवसाचे पगार देण्यास प्रशासनाने नाकारले आहे. सर्व बाबींवरील खर्च वाचवून शहर अभियंता यांच्यावर खर्च करावयाचे काय?

श्री.वसंत नरवडे : महापालिकेचे नुकसान होत असेल तर गेल्या चार महिण्यांची वसुलीही करता येते,

श्री.सतिष कटकटे : शासनाचे अधिकारी/कर्मचारी ॲडव्हान्स घेउन गेलेले आहे, त्यांच्याकडुन वसुली केली गेली नाही.

श्री.संजय जोशी : सभागृहाने विषयास वेगळे वळण देउ नये माझे म्हणने आहे की, शहर अभियंता हे पद ड वर्ग महापालिकेत कुठल्या संवर्गातुन भरले जाते.

श्री.वसंत नरवडे : शासनाने पाठविलेला माणुस आहे शासनास पत्र देण्यात यावे. शासनाचे निर्देश येईपर्यंत त्यांचा पगार बंद करण्यात यावे, शासनास आपण मागणी केलेली नाही.

मा.सभापती : स.सदस्य श्री.जोशी त्यांचा पगार बंद करायचा का?

श्री.वसंत नरवडे : होय.

मा.सभापती : आमच्या सदस्यांनी मागणी केली ती मंजूर आहे.

श्री.अब्दुल रशिद मामु : सर्व्हिस चालु असतांना पगार थांबविणे हा गुन्हा आहे. आपल्याला त्यांचा पगार थांबविण्याचा अधिकार नाही.

मा.सभापती : पगार थांबविण्याचा अधिकार नाही तर बेकायदेशीरपणे पगार देत आहोत.

श्री.अब्दुल रशिद मामु : बेकायदेशीर आहे हे पडताळुन दाखवा.

मा.सभापती : मा.आयुक्त जे निर्णय देतील ते सर्वांना मान्य असेल. स.स.श्री.संजय जोशी यांनी जो मुद्दा उपस्थिती केलेला आहे तो एकदम बरोबर आहे, महापालिका हि ड वर्गात आहे आणि ड वर्गात शहर अभियंता यांची आवश्यकता आहे काय.

श्री.वसंत नरवडे : मा.सभापती आणि श्री.संजय जोशी यांच्या म्हणण्याला आम्ही मान्यता देतो. शासनास याबाबत विचारणा करण्यात यावे.

मा.सभापती : प्रशासनाने जाहिर करावे की, महापालिका क वर्गात मोडते, शासनाचा निर्णय येईपर्यंत त्यांनी महानगरपालिकेचे कुठलेही काम करू नये, त्यांना पगार देण्यात येवू नये.

श्री.अब्दुल रशिद मामु : चर्चामध्ये रूलिंगला मानता येत नाही.

श्री.रविकांत गवळी : महापालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे प्रशासनामार्फत खुलासा येवू दया.

मा.सभापती : मा.आयुक्तांचे काटकसरीचे आदेश आहे, मा.आयुक्तांनी आदेश दिले आहे की, ३००० रूपयांच्यावर बील आल्यास मा.महापौरांनी स्वतः बील भरावे. सर्वांसाठी आचारसहींता आहे तर मग शहर अभियंता यांच्यावर एवढा खर्च कशासाठी करावयाचा. शासनाचा निर्णय येईपर्यंत त्यांनी काम करू नये, पगार घेवू नये.

श्री.सतिष कटकटे : गेल्या आठ महिण्यांपासून मा.सभापती बैठक घेत आहे बैठकीत झालेल्या रूलिंगवर प्रशासनाकडून कारवाई होत नाही.

मा.सभापती : प्रशासनाने स्थायी समितीमध्ये झालेल्या रूलिंगवर मा.आयुक्तांनी दखल घेतलेली आहे. मा.आयुक्तांचे स्थायी समितीतर्फे अभिनंदन करतो. विषयपत्रीके व्यतिरीक्त विषयाची चर्चा करू नये. ज्या विषयावर चर्चा करावयाची आहे तो विषय पुढील बैठकीत आणुन त्यावर चर्चा करू.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : विषय पत्रिकेच्या बाहेरील विषययावर यापुढे चर्चा करण्यात येवू नये.

श्री.संजय जोशी : लोकशाहीमध्ये मा.सभापती यांना एकटयांना निर्णय घेता येत नाही.
सगळयांनी मिळुन निर्णय घेण्यात येवू.

श्री.वसंत नरवडे : मा.सभापती यांनी दिलेल्या रूलिंगप्रमाणे सदरचा विषयावर चर्चा करता येणार नाही,

श्री.नारायण कुचे : मा.सभापती एकटे निर्णय घेवू शकत नाही.

श्री.अब्दुल रशिद मामु : आम्ही सर्व सदस्यांनी मिळून एका प्रस्तावावर चर्चा करावयाची आहे.महानगरपालिकेची आर्थीक स्थिती खराब आहे ती सुधारण्यासाठी काय करायला पाहिजे त्याबाबतीत एक प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी एक पत्र दिले आहे की, मा.महापौर व सभापती यांचे टेलिफोन बिल ३००० च्या वर आले तर वरील पैसे त्यांनी स्वत:च्या खिश्यातुन पैसे भरावयाचे जेव्हा मा.आयुक्त महापालिकेच्या सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवता तेव्हा शहर अभियंता यांच्यावर महापालिका खर्च का करायचा.

श्री.अब्दुल रशिद मामु : महापालिकेची आर्थीक स्थिती लक्षात घेवुन घनकचऱ्याचा ठराव दोन वेळेस रिजेक्ट केला होता त्यानंतरही ठेका दिला गेला. पुर्वी स्थायी समितीने मंजुरी दिली, सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली. ॲग्रीमेंटची कॉपी आम्हाला देण्यात आली नाही, खर्चाबाबत माहिती देण्यात आली नाही, झाडु, नाल्या साफ करण्यासाठी आपले लेबर वापरण्यात येणार आहे त्यावर खर्च किती येणार आहे. फक्त ओला कचरा, कचरा ट्रकमध्ये भरून उचलुन नेणार आहे, महानगरपालिकेत महिण्याला ७ करोड ४० लाख खर्च येतो, तर आम्ही सदरील कंपणीला ११ करोड रूपये देणार आहे. महिण्याच्या ७ करोड ४० लाख मध्ये ट्रक,डिसेल,मजदूर महापालिकेचे ते सोडुन त्यांना ११ करोड रूपये देणार आहे. गाडया बंद पडणार आहे ड्रायव्हर रिकामे बसणार आहे, तसेच त्यांना ४ एकर जमीन, सामान देण्यात येणार आहे. समजा ते मध्येच सोडुन गेल्यावर महापालिका करणार काय? मा.सुप्रिम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे महापालिकेने दिले. मा.सुप्रिम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे मुंबई महापालिकेने १ वॉर्ड दिला, इतर महापालिकांनीही १ वॉर्ड साफसफाईसाठी दिला आहे पंरतु औरंगाबाद महापालिकेने पुर्ण शहरच साफसफाईसाठी दिले आहे हे चुकीचे आहे. पुर्वी एका वॉर्डात साफसफाईचे काम व्यवस्थित होत नव्हते म्हणुन तेथील ठेका रद्द करून रात्रीतुन महापालिकेच्या लेबरकडुन कामे करून घेतले. सदरील रॅम्के कंपणी मध्येच सोडुन गेल्यास महापालिका काय करणार. सध्याची मशीनरी वाचणार. मजुरांवर खर्च, करारनाम्यावर सह्या नाही. ४ एकर जमीन देतो, मशिनरी घेतो, पैसे देण्यात येते. १७ कोटी होतात. ७ कोटीचे ११ कोटी होते. आपण एकमेव पुर्ण शहराचे देतो. दुसऱ्या महापालिकेने ट्रायल बेसीसवर साफसफाईचे काम दिले आहे. लेबरवर आता महापालिकेचे किती खर्च होते व नंतर कंत्राट दिल्यानंतर किती खर्च येणार आहे. कंत्राटदार पालिकेचे ड्रायव्हर घ्यायला तयार नाही, आज ड्रायव्हरचा पगार खुप आहे. १०० वाहन चालक रिकामे होणार. यात महापालिकेचा तोटा आहे तसेच शहरात एक काम होणार नाही. महिन्याला २.५ कोटीचे नुकसान होणार आहे. हे कोण सहन करणार. झाडू, नाल्या साफ आपणच करणार. त्यांचा पगार, डिझेल, मेंटेनन्स, वाहन चालकांचा पगार एकुण किती खर्च होतो. उदा.मा.हाय कोआर्त कोणी गेले तर त्यांना फायदा होईल. करारनामा कसा करणार ते दाखवले नाही, आपण आज रद्द करू शकतो. मा.आयुक्तांचे अभिनंदन रू.३०००/- पर्यंत मर्यादा ठेवली. टेंडर रिकॉल करून पैसे वाचवले तर पुन्हा अभिनंदन करू.

श्री.वसंत नरवडे : शहरातील कचरा उचलण्याचे कंत्राट रॅम्कोला दिले आहे. सिडकोचे काम बचत गटाला देण्यात आले आहे. बचतगटाचे काम वर्षाला १ कोटीत होत असेलतर पुर्ण शहराचे हयाच पध्दतीने साफसफाईचे काम करण्यात यावे. जकातीच्या मार्गाने पालिकेस १२३ कोटी वर्षाला मिळणार आहे आणि ११० कोटी रॅम्केला दयायचे तर विकास कामे काय करणार. हया संदर्भात शासनाकडे सर्वांनी मिळुन महापालिकेच्या परिस्थितीचा, रॅम्कोचा खर्च, लेबरचा प्रश्न मांडण्यात यावा. सिडको हस्तांतरण केलेले आहे त्यावर १ कोटी खर्च मंदीचाही विचार व्हावा. हया सर्वांनी मिळून बजेटच्या पुवी्र प्रयत्न करणे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : आपण जी चर्चा करीत आहे त्यास मी सहमत नाही, दोन वेळेस रॅम्केचा ठराव रद्द केलेला आहे, रद्द केलेला असतांना प्रशासनाने याची दखल घेतली आहे काय? रॅम्केचा ठराव रद्द केलेला आहे याबाबतीत माहिती शासनास कळविण्यात आली आहे काय? शासनाकडुन हयाबाबतीत खुलासा मागितला होता तो आला आहे का? दोन वेळेस रॅम्केचा ठराव रद्द करून सुध्दा प्रशासन ते चालवू इच्छित असेल तर हयात काय प्रकार आहे ते कळत नाही, रॅम्केमुळे शहराचा असा कोणता विकास होणार आहे. हया सर्व गोष्टी आमच्या समोर येवू दया. कायदयाप्रमाणे जो करार केलेला आहे त्यात स्थायी समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या केलेल्या असेल तर ते दोन सदस्य कोणते. ज्या अधिकाऱ्यांनी करारावर कोणाकोणाच्या स्वाक्षऱ्या घेतल्या त्या कुठल्या अधिकारा घेण्यात आल्या त्याबाबतची माहिती सभागृहास कळु दया. दोन वेळेस प्रस्ताव रद्द केल्यानंतर प्रशासनाने कुठली कारवाई केली याबाबत खुलासा देण्यात यावा.

मा.सभापती : सदरील संचिका मागविण्यात येवून त्याची पाहणी केली त्यात टिप्पणीमध्ये स्पष्ट लिहिले आहे की, स्थायी समितीने दोन वेळेस ठराव रद्द केलेला आहे. अशी नोंद श्री.एम.डी.सोनवणे यांनी केलेली आहे. स्थायी समितीने दोन वेळा रद्द केले. नंतर चर्चा होऊन कोणी मान्य केले.

श्री.वसंत नरवडे : स्थायी समितीने एखादा ठराव मंजूर केल्यानंतर तो शासनाकडे मंजूरी करीता पाठविला जातो शासनाकडे पाठविलेल्या ठरावामध्ये दोनदा नामंजुर केला म्हणून हया दोन ओळींचा उल्लेख आहे काय? शासनाला कळविले आहे का.

मा.सभापती : शासनास कळविण्यात आले नाही, मा.आयुक्त यांचेकडे जेव्हा संचिका गेली तेव्हा मा.आयुक्तांनी लिहीले आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शासनाने दिले कस म्हणता. आमच्या ठरावावर प्रशासनाने काय केले प्रशासनाने आमच्या अगेन्स्टमध्ये जावून ठेका दयायचा असेल त्यांना तो अधिकार आहे काय?

मा.सभापती : सहया कोणी कोणी केल्या आहे.

अति.शहर अभियंता : रॅम्कोसोबत जो करार केला आहे त्या करारावर मा.महापौर, मा.विरोधी पक्ष नेता, जे आपण स.पदाधिकारी आहात त्यांच्या सहया आहेत.

श्री.अब्दुल रशिद मामु :स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या सहया घेतल्या आहे काय?

अति.शहर अभियंता : नियमाप्रमाणे स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या सहया घेणे आवश्यक आहे. सहया घेतलेल्या नाही.

श्री.संजय जोशी : स्थायी समितीच्या सदस्यांच्या सहया नसतांना कोणी मंजुर केला.

मा.सभापती : मी संचिका मागवून पाहिजे. स्थायी समितीने दोन वेळेस ठराव रद्द केलेला आहे. अशी नोंद श्री.एम.डी.सोनवणे यांनी केलेली आहे.

श्री.संजय जोशी : वरीष्ठ कोण, सह्या नसतांना कोणी मंजुर केले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : श्री.एम.डी.सोनवणे यांनी करारावर ज्या पदाधिकाऱ्यांच्या सहया घेतल्या आहे त्या कायदेशीर आहे काय?

श्री.सतिष कटकटे : एकीकडे प्रशासन रॅम्केला साफसफाईचे काम देते. सिडको हडको भागात बचत गटा प्रमाणे आहे का.

अति.शहर अभियंता : बचत गटाला साफसफाईचे काम वॉर्ड ब मध्ये दिलेले आहे त्याचे कारण की मागच्या वेळी ऐनवेळेस खाजगी कंत्राटदाराचा ठेका बंद केला परंतु साफसफाईचे काम करणे गरजेचे होते म्हणुन कंत्राटदाराचे जे लेबर होते त्यांच्याकडुन बचत गटामार्फत काम करून घेत आहे. बचत गटाला एकच महिण्यांची ऑर्डर देण्यात आलेली आहे. रॅम्केचे काम सुरू होईपर्यंत साफसफाईचे काम देण्यात आलेले आहे. रॅम्केला ठेका दयायचा की नाही हा जो निर्णय होत नाही तोपर्यंत त्यांच्याकडुन साफसफाई केली जाईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्या पदाधिकाऱ्यांच्या सहया केलेल्या आहे त्यांनी कुठल्या अधिकारात सहया केल्या आहेत ते योग्य आहे काय?

अति.शहर अभियंता : विजया दशमीच्या दिवशी सर्व पदाधिकारी वर्कशॉपमध्ये पुजेच्या वेळी ठरले होते. निर्णय घेतला होता. त्यांनी सह्या केल्या.

श्री.अब्दुल रशिद मामु : रूल प्रमाणे मा.महापौर, व इतर पदाधिकाऱ्यांना पॉवर आहे काय?

अति.शहर अभियंता : स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या सहया घेणे आवश्यक होते.

श्री.वसंत नरवडे पाटील : एकही सही राहिली तर परत पाठवतात. हा करारनामा सुध्दा रद्द होईल.

श्री.वसंत नरवडे : स्वेच्छा निधीच्या २५००० च्या कामाकरीता ॲग्रीमेंटवर सही राहील्यास वर्क ऑर्डर केली जात नाही.

मा.सभापती : सुट्टीच्या दिवशी सहया घेतलेल्या नाही सुट्टीच्या दिवशी चर्चा झालेली आहे. ८ तारखेला झाली चर्चा ९ तारखेला स्वाक्षरी झाली. मी सह्या केल्या नाही. रॅम्के प्रकरणी स्थायी समिती असा निर्णय देत आहे की, सदर ॲग्रीमेंटवर स्थायी समितीच्या दोन सदस्यांची सही नाही, चेअरमनची सही नाही, वर्क ऑर्डर झालेली आहे हया बाबतची संपूर्ण माहिती पुढील स्थायी समितीच्या बैठकीत देण्यात यावी यानंतर निर्णय घेवू. जोपर्यंत स्थायी समितीचा पुन्हा निर्णय होत नाही, काम करू नये. नियमानुसार सदरचा विषय विषयपत्रिकेवर घेवून रद्द करण्यात येईल. जो पर्यंत स्थायी समिती रॅम्केला मान्यता देत नाही तो पर्यंत काम देण्यात येवू नये. रॅम्केचा वर्क ऑर्डर ७.११.२००८ रोजी झालेला आहे एक महिणा होउनही रॅम्केचे काम सुरू नाही. दोन वेळेस ठराव रद्द केलेला आहे, नियमानुसार सदरचा विषय विषय पत्रिकेवर घेवून रद्द करण्यात येईल.

श्रीमती जयश्री किवळेकर : सिडको भागात बचत गटामार्फत एक महिण्यासाठी साफसफाई करण्यासाठी काम दिले आहे त्यांना एक महिण्याऐवजी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात यावे.

मा.सभापती : पुढील स्थायी समितीमध्ये अति.शहर अभियंता यांनी बचत गटास साफसफाईचे काम एक महिण्या ऐवजी एक वर्षासाठी देण्यासाठी प्रस्ताव सादर करावा त्यावर विचार करून निर्णय घेण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे : पुर्वी मालमत्ता नामांतर शुल्क दि. १९.०६.२००८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्रं. २४७ मध्ये त्यात रेडी रेक्नरच्या किंमतीवर १ टक्कया ऐवजी ०.१% किंवा ५०० रूपये यापैक्षा जास्त न घेता नामांतर शुल्क घेण्यास संमती दिलेली आहे परंतु सर्व वॉर्डामध्ये रेडी रेक्नरच्या किंमतीवर १% वसुली केली जाते, ठराव होउन तीन ते चार महिणे झालेले आहे त्याची अमंलबजावणी होत नाही. त्यामुळे नागरीकांना त्याचा त्रास होत आहे.

श्री.संजय जोशी : सर्व साधारण सभेने ठराव मंजूर केलेला असतांनाही त्याची अंमलबजावणी कशामुळे झाली नाही त्याचे कारण देण्यात यावे.

कर निर्धारक व संकलक : नामांतर शुल्क १ टक्कया ऐवजी ०.१ किंवा ५०० रूपये असा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मंजूर केला होता, तो प्रस्ताव रितसर मा.आयुक्तांकडे सादर केला असता मा.आयुक्त यांनी ०.१ ऐवजी ०.५ करण्यात यावे या संदर्भात मा.महापौर व मा.आयुक्त यांचे बोलणे झालेले आहे. मा.आयुक्तांनी सदरचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता पाठविलेला आहे.

श्री.संजय जोशी : मा.माजी आयुक्तांनी आम्हाला विश्वासात न घेता खाली एक ओळ टाकण्यात आली होती रेडी रेकनरच्या एक टक्क्याने तो शासनाकडे पाठविला नाही तर मग हा पाठविण्याची काय गरज आहे, हयाद्वारे शहरात नागरीकांची लुट चालली आहे. ७ लाख किंमत ठरत असेल मिळकतधारक वारल्यानंतर ७०००/- भरावे लागेल. कलेक्टर ऑफीस मध्ये रूपया लागत नाही.

श्री.रविकांत गवळी : सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्याचा आदेश आपण देवू शकतो.

श्री.संजय जोशी : औषधी जकात माफीचा निर्णय झालेला आहे. औषधीवर जकात लावण्याचा निर्णय मा.आयुक्तांनी स्वतःच्या अधिकारात घेवून टाकला आहे.

| | |
|---|---|
| श्री.अब्दुल रशिद मामु | : माझे वैयक्तिक मत आहे की शासनास पत्र पाठवुन शासनास कळविण्यात यावे की, सर्वसाधारण सभेने नामांतर शुल्क ०.१ टक्कया ऐवजी ०.५ केलेला आहे. तसेच सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाऐवजी प्रशासनातर्फे ०.५% करण्यात येवुन त्या दराने आकारणी सुरू केलेली आहे. |
| श्री.संजय जोशी | : शासनाकडे पाठविण्याची गरज नाही. |
| मा.सभापती | : सदरचा ठराव सर्वसाधारण सभेने मंजुर केला होता आणि १६.०२.२००८ रोजी सर्वसधारण सभेने ०.१ टक्का टॅक्स लावण्यात यावा म्हणुन प्रस्ताव मंजुर केला होता, त्याची अंमलबजावणी करण्यात यावी म्हणुन सर्व स.सदस्यांची धारणा आहे म्हणुन स्थायी समिती मा.आयुक्तांना शिफारस करीत आहे की, ०.१ किंवा ५०० यापैकी जे जास्त असेल त्यावर अंमलबजावणी करण्यात यावी. |
| श्री.अब्दुल रशिद मामु | : जे काही झाले ते सदस्यांना दाखवावे. |
| श्री.रविकांत गवळी | : सर्वसाधारण सभेत घेतलेला निर्णय वेगळा असतो व वैयक्तिक चर्चा केलेला निर्णय वेगळा असतो. |
| श्री.संजय जोशी | : याची अंमलबजावणी होणार आहे का? |
| मा.सभापती | : मा.आयुक्त निर्णय घेतील. |
| श्रीमती सफिया मोमिन | : शहरात कुत्र्यांची संख्या वाढत चालली आहे. कुत्र्यांवर लाखो रूपये खर्च होतात. अभियंता कमी करावे. श्री.पवार यांनी लाखो रूपयांचा गैरव्यवहार केलेला आहे त्यांना निलंबीत करावे. |
| श्री.अब्दुल रशिद मामु | : सुप्रिम कोर्टाच्या आदेशा प्रमाणे ज्या ठिकाणाहुन कुत्र्यांना पकडुन नेले जाते त्यांच्यावर नसबंदीची शस्त्रक्रिया करून पुन्हा त्याच ठिकाणी सोडण्यात यावे. |
| श्री.रविकांत गवळी | :कुत्रे चावल्यानंतर ॲन्टी रॅबिजची लस उपलब्ध आहे काय? त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा. |
| पशुसंवर्धन अधिकारी | : १६ सप्टेंबर पासून कुत्र्यांचा नसबंदीचा कार्यक्रम अंमलात आणलेला आहे. मागील ३० तारखेपर्यंत २१३१ कुत्र्यांची नसबंदी केलेली आहे. नगर येथील संकल्प प्राणी सेवा संस्था यांना हे काम देण्यात आले होते. आयुक्त कार्यालयात ॲनीमल बर्थ कंट्रोलची ३० तारखेला बैठक झाली खाजगी संस्थेला देण्यात आलेले काम बंद करण्याचे आदेश दिले होते. आणि खाजगी बेरोजगार पशुवैद्यकीय डॉक्टरांकडुन हे काम करून घेण्याबाबत सुचना होत्या त्यानुसार १ तारखेपासून काम करून घेण्यात येईल. |
| श्री.रविकांत गवळी | : मागील ३० तारखेपर्यंत २१३१ कुत्र्यांची नसबंदी केलेली आहे शहरात कुत्र्यांची एकुण संख्या किती आहे. |
| पशुसंवर्धन अधिकारी | : १५ हजारांच्या आसपास कुत्रे आहेत. ज्या ठिकाणाहुन कुत्रे आणले जातात त्या ठिकाणी नसबंदी केल्यानंतर सोडायला पाहिजे परंतु वॉर्डातील नागरीकांचा त्यास विरोध असल्यामुळे काही कुत्रे नारेगांव स्ट्रेचिंग ग्राउंडवर सोडण्यात आलेले आहे. डॉग शेल्टरचे काम चालू आहे. |
| श्री.अब्दुल रशिद मामु | : Male व Female किती आहेत. |
| पशुसंवर्धन अधिकारी | : निश्चित आकडा थोडयावेळात देण्यात येईल. |
| मा.सभापती | : नारेगांव येथेच कुत्रे का सोडण्यात येतात. |
| पशुसंवर्धन अधिकारी | : नागरीकांचा विरोध असतो. डॉग सेंटरचे काम सुरू आहे डॉग सेंटरचे काम पुर्ण झाल्यास तिथे ते सोडण्यात येतील. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : कुत्र्यांचा बंदोबस्त करावा लागेल तसेच जेथुन कुत्रे पकडण्यात येतात तेथेच कुत्रे सोडण्यात यावे. नारेगांव येथे कुत्रे सोडण्यात येवु नये. |
| श्री.कचरू मोरे | : भांडार विभागाने २००५-०६ ते २००९ पर्यंत बिना निवीदेची खरेदी केली त्याबाबतची यादी मागीतली होती ती अद्याप पर्यंत प्राप्त झाली नाही. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करावा. |

सहाय्यक आयुक्त-१ : भांडार विभागामार्फत जी खरेदी केलेली आहे ती दरवर्षी निवीदा काढुन खरेदी केलेली आहे. कुठलेही खरेदी डायरेक्ट केलेली नाही. छोटया ज्या वस्तु आहेत पाच ते दहा हजारांच्या त्या दरपत्रक मागवुन खरेदी केलेली आहे.

श्री.कचरू मोरे : मुख्य लेखा परिक्षकांचे एक पत्र प्राप्त झालेले आहे सन २००७-०८ मध्ये १२लाख ३९ हजारांची बिना निवीदा खरेदी केलेली आहे.

सहाय्यक आयुक्त-१ : सदरचा विषय भांडार विभागाशी संबधीत नसुन तो सर्व शिक्षा अभियान या विभागाशी निगडीत आहे.

मा.सभापती : भांडार विभागा बाबत माहिती मागीतली होती ती देण्यात आली नाही.

सहाय्यक आयुक्त-१ : भांडार विभागाअंतर्गत १९७० च्या जी.आर प्रमाणे खरेदी केलेली नाही व हा विषय भांडार विभागाशी संबधीत नाही.

मा.सभापती : १२लाख ३९ हजारांची बिना निवीदा खरेदी झालेली आहे व मुख्य लेखा परिक्षक यांचा जो अहवाल आहे त्यात म्हटले आहे की वरील खरेदी करीता शासन परीपत्रक क्रमांक शिक्षण विभाग/mis/१०६८/६८४ दिनांक २७ ऑगष्ट १९७० चा आधार घेतलेला आहे. सदरील आदेश शासन निर्णय दि. ०२ जानेवारी १९९२ नुसार रद्द झालेला आहे. रद्द झालेले असतांना २००७-०८ मध्ये डायरेक्ट खरेदी झाली. याबाबत स्थायी समितीकडे एक वर्षाची माहिती आलेली आहे. स.सदस्यांनी चार वर्षाची माहिती मागीतली होती. या प्रकरणी श्री.डी.पी.कुलकर्णी, कार्य.अभियंता आणि लिगल ॲडवायझर या दोन सदस्यांची समिती गठीत करीत आहे. सन १९७० च्या जी.आर.नुसार तो सन १९९२ ला रद्द झाला असतांना त्याचा आधार घेवून सन २००५-०६ पासून आतापर्यंत जी खरेदी केली आहे त्याबाबत श्री.डी.पी.कुलकर्णी व लिगल ॲडवायझर यांनी चौकशी करून १५ दिवसांच्या आत स्थायी समितीस रिपोर्ट सादर करावे.

श्री.नारायण कुचे : मोहल्ला बुढ्ढीलाईन नगर भुमापन क्रमांक २३५० बाबत माहिती देण्यात यावी तसेच शहरात ३०० मोबाईल टॉवर आहेत, परवानगी किती लोकांना देण्यात आलेली आहे.

मा.सभापती : परवानगी कुणालाही दिलेली नाही. शहर अभियंता यांचे याबाबतीत एक पत्र आलेले आहे. शहरातीत सर्व मोबाईल टॉवरचे संरक्षण नगर रचना विभागात तसेच सक्षम अधिकाऱ्यामार्फत घेण्यात आलेले आहेत. सर्वे होताच पुर्ण माहिती तात्काळ कळविण्यांत येईल. १५० संचिका प्राप्त झालेल्या आहेत कुणालाही परवानगी दिलेली नाही परंतु काही जणांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. गेल्या १५ वर्षापासून शहरात मोबाईल टॉवर आहे व आपल्याकडे ठोबळमानाने माहिती उपलब्ध आहे.

श्री.संजय जोशी : काही चलन दिलेले आहे, त्यात वोडाफोन लिमिटेड आणि पैसे भरून घेतले ९४ हजार रूपये एकामध्ये पण तपशील दिलेला नाही. जे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे तेही चुकीचे आहे.

श्री.वसंत नरवडे : ज्या १५० संचिकांना परवानगी नाकारलेली आहे परंतु एनओसी दिलेली आहे त्यामुळे डायरेक्ट परवानगी दिली असा समज त्यांच्यात झालेला आहे. वसुली केली तर कोटयांवधी रूपयांची वसुली होईल. हयाबाबतीत प्रशासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. आर्थिक परिस्थितीचा छळ बसलेला आहे. NOC म्हणजे बांधकाम परवानगी आहे का.

शहर अभियंता : मोबाईल टॉवरच्या बाबतीत सर्वेक्षण चालू आहे आतापर्यत वॉर्डअधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविण्यात आले होते काही वॉर्ड अधिकाऱ्यांचे रिपोर्ट आलेले आहे एका वॉर्डामध्ये ५० च्या आसपास मोबाईल टॉवर आहे. जास्त असू शकेल. सर्वेक्षण एका महिण्यात पुर्ण करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत व नोटीसा देण्यास सुरवात केलेल्या आहे. १५० संचिका परवानगीसाठी उपलब्ध आहे यापुर्वी दर आकारण्याबाबत

सर्वसाधारण सभेने एक निर्णय घेतलेला आहे. किती दर आकारावा याबाबत टि.पी. ॲक्टमध्ये तरतुद नाही व हाय कोर्टाचा निर्णय २००७ मध्ये झाला मग सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला शासनाने दिलेल्या दराप्रमाणे दर आकारून नियमात बसवून नागरीकांची तक्रार नसेल तिथे मोबाईल टॉवर अधिकृत करणार आहे. एक महिण्यापर्यंत संधी देण्यात आलेली आहे नसता त्यानंतर त्यांच्यावर कारवाई करणार आहे. काढण्यात येईल.

मा.सभापती : मा.उच्च न्यायालयाचा निर्णय काय आहे.

शहर अभियंता : मोबाईल टॉवरचे मालक हाय कोर्टात गेले होते त्याबाबत रिट पिटीशन दाखल झाले होते. कोर्टाने सांगीतले की, Take appropriciate action in accordance with provision of the law in force relation to construction & development under the M.R.T.P. act and rules & regulation made there under as well as under various corporation act applicable to the respondent all the petition there for succeed & rule issued all these petition made absolute in above with no order as to cost.

मा.सभापती : मा.हाय कोर्टाचा निर्णय केव्हा झाला व निर्णय झाल्यानंतर काय झाले.

शहर अभियंता : सन २००७ साली निर्णय दिला त्यानंतर शासनाने दर कळविलेले होते.

श्री.रविकांत गवळी : कोर्टाने जो आदेश दिला त्यानंतर काय कार्यवाही झाली आहे.

मा.सभापती : पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

श्री.संजय जोशी : डी.सी. रूल प्रमाणे एखादया अपार्टमेंटवर टॉवरला परवानगी देता येत नाही. अपार्टमेंटमध्ये २० लोक राहतात त्यांचा हक्क फक्त सदनिका पुरता असतो, मोबाईल टॉवरमुळे त्या संपुर्ण बिल्डींगला तडे जातात आणि एफ. एस.आय. पुर्णपणे वापरलेला असतो. त्यामुळे मोबाईल टॉवरला परवानगी देणेच चुकीचे आहे.

श्री.रविकांत गवळी : महिण्याभरात किती मोबाईल टॉवर शहरात आहे याची माहिती समोर येवू द्या. त्यानंतर सविस्तर चर्चा करण्यात येईल.

मा.सभापती : शहरात १९९४-९५ मध्ये मोबाईल टॉवर सुरु झाले आहे व तेव्हापासून परवानगी दिलेली नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : कुणाच्या अधिकारात मोबाईल टावर उभे केले आणि कुणी त्यांना परवानगी दिली.

श्री.रविकांत गवळी : मोबाईल टॉवरबाबतची संपुर्ण माहिती प्राप्त करुन त्यावर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.अब्दुल रशिद मामु : इतर महानगरपालिकांची कश्या पध्दतीने एन.ओ.सी.दिली याबाबत माहिती घेण्यात यावी. शासनाचा एक जी.आर.आहे की, मोबाईल टॉवर काढण्यात येवू नये. ज्या अनाधिकृत बिल्डींग आहे त्यावरच मोबाईल टॉवरची संख्या जास्त आहे. प्रथम नोंद तर होऊ द्या.

शहर अभियंता : शासनाचा निर्णय असाच आहे की, मोबाईल टॉवर काढण्यात येवू नये. दि.२९.०१.२००७ रोजी शासनाचे एक पत्र आहे. कार्यवाही करावयाची आहे.

मा.सभापती : याबाबत स्थायी समिती, मा.शहर अभियंता यांना आदेशीत करते की, औरंगाबाद महापालिकेच्या हद्दीमध्ये किती मोबाईल टॉवर आहे याची लिखीत माहिती स्थायी समितीस देण्यात यावी नंतर पुढील कारवाई करण्याचे आदेश देण्यात येईल.

श्री.रविकांत गवळीु : मोबाईल टॉवरमुळे ३ ते ३.५० कोटींची महसूल वाढ होणार आहे. अग्निशमन विभागात प्रोव्हिजन करणार. ०६.१.२००८ रोजी करणार होतो ती कार्यवाही सुरू केली का?

श्री.वसंत नरवडे : प्रशासनाने एखाद्या अधिका-याची बदली केली तर त्यास रुजू करण्यास त्याला सोडण्यास किती दिवसाचा कालावधी लागतो. महापालिकेत एस.आय.पाटील,

| | |
|---|---|
| | स्वच्छता निरीक्षक यांची बदली झाली आहे त्यांना वॉर्ड अधिकारी सोडत नाही. प्रशासनाचा कुणावर अंकुश आहे की नाही. |
| मा.सभापती | : श्री.एस.आय.पाटील,स्वच्छता निरीक्षक यांना प्रशासनाने तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे. |
| सौ.अल्पा विकास जैन | : बॅडमिंटन हॉलची देखरेख करीता सुपरवाईझरची नियुक्ती केली आहे त्यांना खाजगी कोचींग करण्याचा अधिकार आहे काय? तो खाजगी कोचींग करतो. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : मनपा मानधन देते तेव्हा त्यास खाजगी कोचींग करण्याचा अधिकार नाही. |
| मा.सभापती | : प्रशासनाने खुलासा सादर करावा. |
| उपआयुक्त(प्र) | : याबाबत आजच चौकशी करून सबंधीतावर कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.संजय जोशी | : वीर सावरकर सभागृह तसेच इतर सभागृह एक एक वर्षाकरीता टेंडर काढुन भाडयाने दिलेले आहेत. रजिस्ट्रीच्या एक टक्का महापालिकेत रक्कम भरा म्हणुन सांगण्यात आले, ती जवळपास १४ ते १५ हजार व त्याव्यतिरीक्त भाडे वेगळे, जे १२ हजार आहे ते नापरतावा आहे. एक वर्षासाठी डिपॉसिट आकारून भाडे आकारण्यात येते, सदरच्या सभागृहासाठी शासनाची फिस भरावयाला लावतो हे चुकीचे आहे नसता त्यांना दहा विस वर्षासाठी भाडयाने देण्यात यावे. अकरा महिण्यांसाठी १२ हजार भरावयाचे, भाडे वेगळे आणि डिपॉझिट वेगळे भरायचे, त्यापेक्षा बॉन्डवर ॲग्रीमेंट करण्यात यावे नसता मुदतवाढ देण्यात यावी. |
| मा.सभापती | : मालमत्ता विभागाने खुलासा करावा. |
| मालमत्ता अधिकारी | : लिजवर देतो त्यावेळी करारनामा केला जातो. रजिष्ट्रेशन ॲक्ट प्रमाणे करारनामा करणे आवश्यक आहे. यापुर्वीही आपण केलेले आहे. नियमानुसार करतो. |
| श्री.रविकांत गवळी | : भाडयाव्यतिरीक्त रजिष्ट्रशनचा खर्च १२ हजार रूपये येतो तेव्हा त्यांना मुदतवाढ देण्यात यावी. |
| श्री.संजय जोशी | : लिजचे ॲग्रीमेंट वेगळे असते आणि भाडेपट्टा हया वेगळया बाबी आहे. जे सभागृह भाडयाने दिले जाते ते भाडेपट्टयाने दिले जाते. |
| मा.सभापती | : १००/- रूपयांच्या बॉन्ड पेपरवर करता येते. |
| श्री.सतिष कटकटे | : माझ्या वॉर्डात वॉर्ड इंजिनिअर नाही. |
| शहर अभियंता | : बहुसंख्य सदस्यांची अशीच तक्रार आहे, सगळया वॉर्डात वॉर्ड इंजिनियअर देण्याची व्यवस्था करण्यात येईल. |
| श्री.रविकांत गवळी | : वॉर्ड अ मध्ये ज्युनिअर इंजिनिअर सब ओव्हरसिअर कॅडरचे आहे. १६ वॉर्डात कामे चालतात. ते नेतेगिरी करीत फिरतात. कायमस्वरूपी द्यावे. |
| मा.सभापती | : वॉर्ड अ मध्ये एक ज्युनिअर इंजिनिअर तात्काळ देण्यात यावा. |

**विषय क्र. १६२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९० अंतर्गत एकनाथनगर, तुळसी अपार्टमेंट या भागात १०० व १५० मी.मी. व्यासाची डी.आय.क्र.-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र. WSC-१८ वरील भांडवली कामे मधील अनुक्रमांक ४ अन्वये रक्कम रूपये १०.०० लक्ष एवढ्याची तरतुद ठेवण्यात आली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००६-०७ च्या दरसुची नुसार रक्कम रूपये ८,०४,३५३/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता झाली. त्यानंतर निविदा कार्यवाही झाली होती. निविदा मंजुरीच्या कार्यवाही अंतर्गत मा.शहर अभियंता यांनी सुधारीत दराने अंदाजपत्रक तयार करण्यास आदेशीत केले आहे. त्या प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रूपये १३,६१,२५०/- एवढ्याचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षामधुन करण्यात येणार आहे.

करिता सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये १३,६१,२५०/- चे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९० अंतर्गत एकनाथनगर, तुळसी अपार्टमेंट या भागात १०० व १५० मी.मी. व्यासाची डी.आय.क्र.-९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१३,६१,२५०/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-अ** अंतर्गत मुख्य रस्त्याची डांबरीकरणाद्वारे दुरूस्ती करणे बाबतच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रक्कम रू.१९,४४,५६५/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम रस्ते दुरूस्ती पॅच वर्क मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकूण पाच निविदा विक्री झाल्या. त्यापैकी एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एम. ए. सिद्यीकी | १४.८६% जास्त दराने |
| २. | मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन | १६.६६% जास्त दराने |
| ३. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १८.९०% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.८६% जास्त दराची मे. एम. ए. सिद्यीकी यांची निविदा प्राप्त झाली होती. सदर दराची डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता १.३५% जास्त दर येत आहेत. यामुळे सदरील कामावर रक्कम रूपये १९,७०,८१६/- एवढा खर्च होणार आहे. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामासाठी मे. एम. ए. सिद्यीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३५% जास्त दराच्या निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-अ** अंतर्गत मुख्य रस्त्याची डांबरीकरणाद्वारे दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झ ाालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम मे.एम.ए.सिद्यीकी यांचेकडून अं.प. दरापेक्षा १.३५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-क** अंतर्गत मुख्य रस्त्याची डांबरीकरणाद्वारे दुरूस्ती करणे बाबतच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रक्कम रू.१९,२६,४२२/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम रस्ते दुरूस्ती पॅच वर्क मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकूण पाच निविदा विक्री झाल्या. त्यापैकी एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १३.९०% जास्त दराने |
| २. | मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन | १६.१६% जास्त दराने |
| ३. | मे. एम. ए. सिद्यीकी | १८.८६% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.९०% जास्त दराची मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झ ाली होती. सदर दराची डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता १.३२% जास्त दर येत आहेत. यामुळे सदरील कामावर रक्कम रूपये १९,५१,८५०/- एवढा

खर्च होणार आहे. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामासाठी मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३२% जास्त दराच्या निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-क** अंतर्गत मुख्य रस्त्याची डांबरीकरणाद्वारे दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दरापेक्षा १.३२% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-ब** अंतर्गत मुख्य रस्त्याची डांबरीकरणाद्वारे दुरूस्ती करणे बाबतच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रक्कम रू.१९,८०,१९४/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम रस्ते दुरूस्ती पॅच वर्क मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकूण सहा निविदा विक्री झाल्या. त्यापैकी एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन | १४.२०% जास्त दराने |
| २. | मे. एम. ए. सिद्यीकी | १६.८६% जास्त दराने |
| ३. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १८.९०% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.२०% जास्त दराची मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली होती. सदर दराची डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता १.३६% जास्त दर येत आहेत. यामुळे सदरील कामावर रक्कम रूपये २०,०७,१२४/- एवढा खर्च होणार आहे. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामासाठी मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३६% जास्त दराच्या निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-ब** अंतर्गत मुख्य रस्त्याची डांबरीकरणाद्वारे दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दरापेक्षा १.३६% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या कारभारात गती व अधिक सुसूत्रता आणण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत ERP Solution (Enterprise Resource Planning Base Solution) योजना अंमलात आणण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक ११/८/२००६ ठराव क्र.२९२/११ नुसार मान्यता झालेली आहे. तसेच मा.स्थायी समिती सभा दि.२०/३/२००७ ठराव क्र.३०२ नुसार सदर योजना अंमलात आणण्यासाठी M/s. CMC Ltd. मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीत सदरील योजना अंमलात आणण्याचे काम प्रगती पथावर आहे.

ही योजना पूर्णपणे अंमलात आणण्यासाठीच्या उपाययोजनेचा एक मुख्य भाग म्हणजे "मुख्य कार्यालय व वॉर्ड कार्यालयात Networking करून ते मुख्य कार्यालयातील Server Room शी जोडणे" असा आहे.

मुख्य कार्यालय व विभाग कार्यालयात Networking करण्यासाठी आराखड्यासह दरपत्रक सादर करण्यासाठी निविदा दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक सामना या वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्यात आली. यासाठी खालील तीन निविदा प्राप्त झाल्या.

१. Alphanso Net Secure Pvt. Ltd. Pune.

२. Tullip Telecom Ltd.

३. Virgo Sales & Services, Aurangabad.

प्राप्त निविदा धारकांच्या तांत्रिक निविदा प्रस्तावाची छाननी ERP Implementation करणारी यंत्रणा M/s. CMC Ltd. मुंबई यांचेकडून करून घेण्यात आली व तांत्रिक दृष्ट्या योग्य अश्या -

Alphanso Net Secure Pvt. Ltd. व Tullip Telecom Ltd. यांच्या व्यापारी निविदा उघडण्यात आल्या.

त्यानुसार प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| Sr. No. | **Item/Bidder** | **Tullip Telecom** (Amount in Rupee) | **Alphanso Net Secure Pvt. Ltd.** (Amount in Rupee) |
|---|---|---|---|
| १. | **Schedule- I** Active Network | **23,42,956.00** | **9,60,000.00** |
| २. | **Schedule- II** Passive Network | **2,46,795.00** | **4,80,300.00** |
| ३. | **Schedule- III** Optic Fiber | **90,802.00** | **99,050.00** |
| ४. | **AMC** for First Three Years | Above Rate inclusive of three years AMC | **1,50,000.00** |
| ५. | **AMC** for Further Three Years i.e. 4th, 5th and 6th year | **8,03,988.00** | **1,80,000.00** |
| | **एकुण रूपये** | **34,83,945.00** | **18,69,350.00** |

उपरोक्त तक्त्या नुसार M/s Alphanso Net Secure Pvt. Ltd. यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी असून त्यांचे तांत्रिक Design सुयोग्य असल्याचा निर्वाळा M/s. CMC Ltd. मुंबई तसेच प्रकल्पासाठी महानगरपालिकेस तांत्रिक सल्ला देणाऱ्या केंद्र शासनाच्या DOEACCA औरंगाबाद या संस्थेने दिला आहे. तसेच DOEACCA यांनी प्राप्त दर हे योग्य असल्या बाबतही त्यांचे पत्र क्र. DOEACCA/GEN/AMC/८१४ दिनांक २० ऑक्टोबर २००८ अन्वये कळविले आहेत.

सबब उक्त तक्त्यात दर्शविल्या नुसार दराप्रमाणे Alphanso Net Secure Pvt. Ltd. यांचे दराप्रमाणे अंदाजपत्रकासह निविदेस मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कारभारात गती व अधिक सुसूत्रता आणण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत ERP Solution (Enterprise Resource Planning Base Solution) योजना अंमलात आणण्यासाठीच्या उपाययोजनेचा एक मुख्य भाग म्हणजे "मुख्य कार्यालय व वॉर्ड कार्यालयात Networking करून ते मुख्य कार्यालयातील Server Room शी जोडणे" अंतर्गत मुख्य कार्यालय व विभाग कार्यालयात Networking करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी कमी दराचे निविदेनुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या

दराप्रमाणे Alphanso Net Secure Pvt. Ltd. यांचे दराप्रमाणे अंदाजपत्रकासह निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| Sr. No. | Item/Bidder | Alphanso Net Secure Pvt. Ltd. (Amount in Rupee) |
|---|---|---|
| १. | **Schedule- I** Active Network | **9,60,000.00** |
| २. | **Schedule- II** Passive Network | **4,80,300.00** |
| ३. | **Schedule- III** Optic Fiber | **99,050.00** |
| ४. | **AMC** for First Three Years | **1,50,000.00** |
| ५. | **AMC** for Further Three Years i.e. 4th, 5th and 6th year | **1,80,000.00** |
| | **एकुण रूपये** | **18,69,350.00** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

***: ऐनवेळचे विषय :***

**विषय क्र. १६७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९८ अंतर्गत नक्षत्रवाडी भागातील दत्तनगर, अजिंक्य हौसिंग सोसायटी येथे पाणी पुरवठा करण्यासाठी १५० मी.मी. व्यासाची डीआयके - ९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००५-०६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.९,००,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता झाली. त्यानंतर निविदा कार्यवाही झाली होती. निविदा मंजुरीच्या कार्यवाही अंतर्गत मा.शहर अभियंता यांनी सुधारीत दराने अंदाजपत्रक तयार करण्यास आदेशीत केले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१८,६२,३९६/- एवढ्याचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे.

करीता सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१८,६२,३९६/- चे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९८ अंतर्गत नक्षत्रवाडी भागातील दत्तनगर, अजिंक्य हौसिंग सोसायटी येथे पाणी पुरवठा करण्यासाठी १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१८,६२,३९६/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६८ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, देवगिरी कॉलेज लगत रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००७-०८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.७,५८,४६२/- इतकी यापुर्वी मान्यता झाली आहे. निविदा श्री.के.बी.पथ्रीकर यांना प्रदान करण्यात आलेली होती. परंतु मा.राष्ट्रपती यांचा कार्यक्रम अचानकपणे ठरलेल्या मार्गाने न होता मार्गात बदल झाल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये वाढ झाली असून ती रू.११,७५,०००/- इतकी झाली आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च शहरी भागात पुन:र्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षाखाली पृष्ठ क्र.१७६ व १७७ अ.क्र.३ वर उपलब्ध तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी यापुर्वी मंजूर असलेल्या निविदाधारक श्री.के.बी.पाथ्रीकर गुत्तेदार यांच्याकडून काम करून घेण्यात आलेले आहे. करीता सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेसह निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथापी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवगिरी कॉलेज लगत रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणे या कामाच्या मार्गात बदल झाल्यामुळे र.रू.११,७५,०००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी यापुर्वी मंजुर असलेल्या निविदाधारक श्री.के.बी.पाथ्रीकर यांच्याच्याकडून करून घेण्यात आलेल्या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.५७ भवानी नगर वसाहती अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसूची नुसार रक्कम रू.१०,९७,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम दलित वस्ती सुधार योजना सन २००७-०८ अनुदानातील तरतुदी मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी प्रथम निविदापत्रके मागविली असता ३९.९% जास्त दर प्राप्त झाले. सदरचे दर जास्त वाटतात व एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे फेरनिविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.चंद्राम एन. आशन्ना | २४.९०% जास्त दराने |
| २. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ३१.००% जास्त दराने |
| ३. | श्री.के.बी.पाथ्रीकर | ३४.२१% जास्त दराने |
| ४. | श्री.एम.ए.सिद्यीकी | ७२.००% जास्त दराने |
| ५. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ९९.१०% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९०% जास्त दराची श्री.चंद्राम एन. आशन्ना यांची निविदा प्राप्त झाली होती. सदर कामाच्या दनाचे सन २००७-०८ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार तुलना केली असता, ३.५६% कमी दर येत आहे.

तरी श्री.चंद्राम एन.आशन्ना यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.०९% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ५७ भवानी नगर वसाहती अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९०% जास्त दराची श्री. चंद्राम एन. आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०**

कार्यकारी अभियंता (ड्रे/वि/इ व उ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जालना रोड लगत असलेल्या महसुल प्रबोधिनीच्या शासकीय जागेवर डी.पी.डी.सी. अंतर्गत प्राप्त होणाऱ्या ७५.०० लक्ष निधीमधून राज्यातून विविध शैक्षणिक सहलीसाठी येणाऱ्या विद्यार्थी पर्यटकांसाठी टुरीस्ट सेंटर बांधण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावास व जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदरील कामास्तव सन २००७-०८ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.७५.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकउून सन २००८-०९ या आर्थिक वर्षा अंतर्गत रक्कम रू.५०.०० लक्ष चा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. व उर्वरीत २५.०० लक्ष चा निधी हा पुढील आर्थिक वर्षात म्हणजेच सन २००९-१० या

आर्थिक वर्षाअंतर्गत वितरीत करण्यात येणार आहे. मा.सर्वसाधारण सभेने रक्कम रू.५०.०० लक्ष च्या अंदाजपत्रकास विषय क्र.३३६ दिनांक ३१.१०.२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत एकुण अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ५ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला ५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | ७.२% कमी दराने |
| २. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | ६.९% कमी दराने |
| ३. | अन्सारी कन्स्ट्रक्शन कंपनी | ६.३% कमी दराने |
| ४. | गोसावी एस. के. | ६.६६% जास्त दराने |
| ५. | श्रीहरी असोसिएट्स प्रा.लि. | १८.००% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२% कमी दराची निविदा मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची असून मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड लगत असलेल्या महसुल प्रबोधिनीच्या शासकीय जागेवर डी.पी.डी.सी. अंतर्गत प्राप्त होणाऱ्या ७५.०० लक्ष निधीमधून राज्यातून विविध शैक्षणिक सहलीसाठी येणाऱ्या विद्यार्थी पर्यटकांसाठी टुरीस्ट सेंटर बांधण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील मुख्य रस्त्यावरील २५० वॅटच्या सोडीयम व्हेपर फिटींग काढून त्या ठिकाणी BOT तत्वावर एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्यात आलेल्या आहेत. निघालेल्या जुन्या एकूण ४००० फिटींग विकण्याकरीता निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/७४/०८ दिनांक २०/८/२००८ नुसार चौथी वेळ वर्तमानपत्रात प्रसिध्द करून दर मागविण्यात आले असता एकूण दोन दरपत्रके प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

१. मे. महाराष्ट्र ट्रेडर्स, औरंगाबाद. - रू.३६०/- प्रती नगा प्रमाणे.

२. मे.ईगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद - रू.२९०/- प्रती नगा प्रमाणे.

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त मे.महाराष्ट्र ट्रेडर्स यांचे रू.३६०/- प्रती नगाचे दर आहेतज. रू.३६०/- प्रती नगाप्रमाणे एकुण ४००० फिटींग करीता रू.१४,४०,०००/- मनपास प्राप्त होणार आहेत.

करीता मे.महाराष्ट्र ट्रेडर्स यांचे प्रती नग रू.३६०/- प्रमाणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.सतीश कटकटे : प्रस्तावात दर्शविल्यानुसार या कामाकरीता फक्त दोनच दरपत्रके प्राप्त झाली आहेत. स्पर्धात्मक दर प्राप्तीसाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे.

मा. सभापती : स.सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे सदर कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावेत.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्पर्धात्मक दर प्राप्तीसाठी सदर कामाकरीता पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १७२**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.शेख रईस शेख महेबुब, रा.सब्जीमंडी, औरंगाबाद यांचे पैठणगेट येथे याबा ऑटो गॅरेज या नांवाचे दुकान होते. या दुकानावरच त्यांचे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. रस्ता रूंदीकरणामध्ये महानगरपालिकेने त्यांच्या दुकानाची जागा ताब्यात घेतल्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट झालेले असून त्यामुळे त्यांचे कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

श्री.शेख रईस शेख महेबुब,सब्जीमंडी, औरंगाबाद यांनी लेखी अर्जाद्वारे विनंती केलेली आहे की, पैठणगेट येथील मिरांसलामी शॉपींग कॉम्प्लेक्समध्ये अनेक वर्षापासुन रिकामे असलेले दुकान क्र. एस-१ व एस-२ हे त्यांना भाडेतत्वावर देण्यात यावेत. नियमानुसार दुकानाचे भाडे भरण्यास तयार आहेत. तरी अर्जदाराचे विनंतीनुसार त्यांचे परिस्थितीचा सहानुभूतीपुर्वक विचार करून पैठणगेट येथे असलेल्या मिरांसलामी शॉपींग कॉम्प्लेक्समधील अनेक वर्षापासुन रिकामे असलेले दुकान क्र. एस-१ व एस-२ नियमाप्रमाणे भाडे आकारून श्री.शेख रईस शेख महेबुब यांना भाडेतत्वावर देण्यात यावेत. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सतीश कटकटे अनुमोदक : श्री. सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.शेख रईस शेख महेबुब, रा.सब्जीमंडी, औरंगाबाद यांचे पैठणगेट येथील याबा ऑटो गॅरेज या नांवाचे दुकान रस्ता रूंदीकरणामध्ये महानगरपालिकेने त्यांच्या दुकानाची जागा ताब्यात घेतल्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट झालेले असल्याने त्यांचे कुटुंबाचे उदरनिर्वाहाचा सहानुभूतीपुर्वक विचार करता संबंधीताचे विनंतीनुसार पैठणगेट येथील मिरांसलामी शॉपींग कॉम्प्लेक्समधील अनेक वर्षापासुन रिकामे असलेले दुकान क्र. एस-१ व एस-२ नियमाप्रमाणे भाडे आकारून श्री.शेख रईस शेख महेबुब यांना भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद